# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (आस्थापना विभाग)

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५
दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४

जा.क्र. गो.वि./आस्था./३५५१/२०१९ दि. ४/१०/२०१९

**प्रति,**
**मा. अध्यक्ष/सचिव**
**सर्व संलग्नित महाविद्यालये,**
**गोंडवना विद्यापीठ, गडचिरोली.**

**प्रति,**
**मा. प्राचार्य**
**सर्व संलग्नित महाविद्यालये,**
**गोंडवना विद्यापीठ, गडचिरोली.**

**विषय:- विधानसभा सार्वत्रिक निवडणुक-२०१९**
**सर्व अनुदानित/विनाअनुदानित शिक्षण संस्थामधील मनुष्यबळांचा निवडणुकीच्या प्रचारासाठी वापर करणाऱ्या व्यक्तींना प्रतिबंध करणे व व्यक्तींविरूध्द कडक व ठोस कार्यवाही तात्काळ करणेबाबत.**

संदर्भ:- मा. जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचे पत्र क्र. कार्या-१०/अका-१/निवड/कावी-१४८२/२०१९ दिनांक २३ सप्तेंबर, २०१९

**महोदय/महोदया,**

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयातील मा. अध्यक्ष, मा. सचिव व मा. प्राचार्यांना कळविण्यात येते की, दिनांक २१/०९/२०१९ पासून महाराष्ट्र राज्य विधानसभा सार्वत्रिक निवडणुक-२०१९ ची आदर्श आचारसंहिता जारी करण्यात आलेली आहे. मा. जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी आदर्श आचारसंहिता पालनाबाबतचे हमीपत्र विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यायातील संस्थाना सादर करण्याबाबतचे स्पष्ट निर्देश दिलेले आहेत. हमीपत्राचा नमुना संलग्नित करण्यात आलेला आहे. संदर्भीय पत्राचे अवलोकन करून तात्काळ आदर्श आचारसंहिता पालनाचे हमीपत्र या कार्यालयाकडे सादर करावे.

**संलग्न:-** हमीपत्राचा नमुना.

**(ईश्वर एस. मोहुर्ले)**
**कुलसचिव**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

**प्रतिलिपी माहितीस्तव सादर :-**

१. मा. कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. जिल्हाधिकारी तथा मा. जिल्हा निवडणुक अधिकारी गडचिरोली.
४. मा. जिल्हाधिकारी तथा मा. जिल्हा निवडणुक अधिकारी चंद्रपुर.

# सादर करावयाचा हमीपत्राचा नमुना.

(संस्थेच्या/महाविद्यालयाच्या लेटरहेडवर महाविद्यालयाच्या नांवासह अध्यक्ष/सचिव/प्राचार्य यांच्या स्वाक्षरीनिशि)

दिनांक २१/०९/२०१९ पासून महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुक-२०१९ ची आदर्श आचारसंहिता जारी करण्यात आलेली आहे याची स्पष्ठ जाणीव असून आदर्श आचारसंहितेच्या पालनाबाबतचे हमीपत्र मी/आम्ही खालीलप्रमाणे सादर करीत आहे/आहोत.

१. आमच्या/माझ्या संस्थेतील/महाविद्यालयातील मनुष्यबळाचा वापर केवळ संस्थेने/महाविद्यालयाने नेमुन दिलेल्या कामकाजासाठीच राहील. कोणत्याही परिस्थीती आमच्या/माझ्या संस्थेतील/महाविद्यालयातील मनुष्यबळाचा वापर राजकिय उमेदवारांच्या प्रचारासाठी वापरले जाणार नाही याची स्पष्ठ ग्वाही देतो/देते.

२. आमच्या/माझ्या संस्था/महाविद्यालयाचे प्रशासनास तसेच संस्था/महाविद्यालयातील मनुष्यबळास आदर्श आचारसंहितेच्या पालनाबाबतची पुर्ण जाणीव आहे. आदर्श आचारसंहिता पालनाची मी लेखी ग्वाही देत असून आमच्या/माझ्या संस्थेत/महाविद्यालयात असलेल्या कोणत्याही मनुष्यबळाचा राजकिय उमेदवारांच्या प्रचारासाठी गैरवापर झाल्यास माझी संस्था/महाविद्यालय कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील याची ग्वाही व लेखी हमी देतो/देते.

# जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणुक अधिकारी, गडचिरोली यांचे कार्यालय

कॉम्प्लेक्स एरीया, चंद्रपुर रोड गडचिरोली पिन कोड क्रमांक 442605

दुरध्वनी क्रमांक 07132-222011 ईमेल आयडी-dydeogad@gmail.com

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली कुलसचिव कार्यालय आवक 6137 दि. 27/9/19 जावक क्र. 9744 30/9/19

क्रमांक /कार्या-10/अका-1/ निवड/कावि-1482/2019 दिनांक - 23 सप्टेंबर, 2019

निवडणुक तात्काळ/अत्यंत महत्वाचे

प्रति,

१) प्रकल्प अधिकारी, एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली/ अहेरी/ भामरागड.
२) उप संचालक, शिक्षण विभाग, गडचिरोली.
३) जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, गडचिरोली.
४) सहा. आयुक्त, समाज कल्याण विभाग, गडचिरोली.
५) जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली
६) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था , गडचिरोली
७) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, गडचिरोली
८) शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, गडचिरोली

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली आस्थापना विभाग आवक क्र. 3663 दि. 30/9/19 जावक क्र.......दि.......

**विषय :- विधानसभा सार्वत्रिक निवडणुक-2019**
**खाजगी अनुदानित सहकारी संस्था व शिक्षण संस्थांमधील मनुष्यबळाचा निवडणुकीच्या प्रचारासाठी वापर करणाऱ्या व्यक्तींना प्रतिबंध करणे व व्यक्तींविरुध्द कडक व ठोस कार्यवाही तात्काळ करणे बाबत.**

गडचिरोली जिल्ह्यामध्ये दिनांक 21.09.2019 पासून विधानसभा सार्वत्रिक निवडणुक 2019 ची आदर्श आचारसंहिता जारी करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने आपणास स्पष्ट निर्देश देण्यात येते की, आपले अधिनस्त येणाऱ्या सर्व प्रकारच्या सरकारी अनुदानित/ खाजगी शिक्षण संस्था व सहकारी संस्था चालकांना त्यांचे संस्थेत मनुष्यबळाचा केवळ त्यांना नेमून दिलेल्या संस्था कामकाजासाठीच वापर केला जाईल याची दक्षता घेण्याची सक्त ताकीद द्यावी. कोणत्याही परिस्थितीत अशा संस्थांमधील मनुष्यबळ कोणत्याही राजकीय उमेदवाराच्या प्रचारासाठी वापरले जाणार नाही, याचे लेखी हमीपत्र सदर सर्व संस्था चालकाकडून घेण्यात यावे.

सदर हमीपत्रात आचारसंहिता पालनाबाबत त्यांना पूर्ण जाणिव असलेबाबत लेखी ग्वाही घेण्यात यावी तसेच आपणाकडील निर्देशांमध्ये अशा संस्थांमधील मनुष्यबळाचा गैरवापर केल्यास करण्यात येणाऱ्यावर कायदेशीर कारवाईचा स्पष्ट उल्लेख करावा.

आपणाकडून प्रतिबंधात्मक स्पष्ट निर्देश प्राप्त होऊनही संस्थांचालकांकडून मनूष्यबळाचा गैरवापर झाल्याची घटना घडल्यास त्यांचे विरुध्द तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणुक अधिकारी,
गडचिरोली

प्रतिलिपी :- माहितीस तथा उचित कार्यवाहीस अग्रेषित.

1. निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, देसाईगंज / गडचिरोली / अहेरी.
2. सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार (सर्व)
3. कुलसचिव गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणुक अधिकारी,
गडचिरोली